२ प्रती

[redacted]
एपिफनी स्कूल.
पुणे-४२.
आवक क्रमांक-
दि. २०.३.९८ क्र. दु २व्या
सही-

जा./.प्रा/प्राशि/मान्यता/पीआर/१५७४०
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे १ यांचे कार्यालय,
दिनांक :- 26 DEC 1997

प्रति,
शिक्षणाधिकारी [प्राथमिक]
जिल्हा परिषद पुणे

विषय:- सन १९९७-९८या शैक्षणिक वर्षात नवीन खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत.

संदर्भ:- शासनाकडील शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक व्हीएलएस-१०९७/(३५७)प्राशि-३ दिनांक ३०-५-९७ चे पत्र.

उपरोक्त विषयासंबंधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधिन पत्र कृपया अवलोकन करावे.

याबाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून १९९७ पासून इयत्ता १ ली ते ४थीपर्यंत सन १९९७-९८या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष सुरू असलेल्या वर्गासह प्रत्येकी एका तुकडीस प्राथमिक शाळा सुरू करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर विना अनुदान तत्वावर " खास बाब " म्हणून परवानगी देण्यात येत आहे. तसेच इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर तसेच भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १) | सोसायटी ऑफ सेंट मेरी द व्हर्जिन इन इंडिया ५ गुरुवार पेठ पुणे-४२ | एपिफनी प्रायमरी स्कूल ५, गुरुवार पेठ पुणे-४२ | १ ली — | इंग्रजी |

२.१ सदर संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

२.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

२.३ शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यवसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद व शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या आधिन राहून नेमला पाहिजे.

२.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापन, विषयक सुविधा इ. शाळा व्यवस्थित चालविण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

२.५ संस्थेने या शाळेसाठी शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मूल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम व उपक्रम यांचे सुयोग्य कार्यान्वियेत केले पाहिजे. व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजे.

२.६ संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंदवह्या अद्यावत आणि विश्वासार्ह स्वरूपात कार्यान्वियत ठेवल्या पाहिजेत.

२.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तशीरपणा नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबविणे आवश्यक आहे. शाळेमध्ये पुरेशी विद्यार्थी संख्या असणे आवश्यक आहे.

/07/10 10:37

२.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इ.मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

२.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाची, कार्यपध्दतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

२.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

२.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यांत येईल.

२.१२ शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबंधित शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नुतनीकरणासाठी अर्ज सक्षम क्षेत्रीय अधिकाऱ्याकडे [ परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे] करणे बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यांत येईल. एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही ही परवानगी देण्यापूर्वी संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची पुन्हा खात्री घेऊन मगच संस्थेला खाजगी शाळेची मान्यता देण्याबाबत कार्यवाही करण्यांत यावी.

१. संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व महाराष्ट्र विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी किंवा केवळ महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.

२. संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

३. सदर संस्थेने चालविलेल्या प्राथमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४. संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत, अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५. संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

६. संस्थेने विहित नमुन्यांत सशुल्क अर्ज केला आहे [यापूर्वी अर्ज केला नसल्यास तो करुन घ्यावा.]

७. शासनाची मंजूरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रुपये १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

८. तरी याबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यांत यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरित या कार्यालयास पाठवावा.

[signature]

~~शिक्षण~~ उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे १. करिता

प्रत :- प्रशासन अधिकारी/महानगरपालिका/~~नगरपालिका~~
शिक्षण मंडळ, ~~----------~~ पुणे-५ जिल्हा ---------- यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत:- मा. सचिव. ~~----------~~
सोसायटी ऑफ सेंट मेरी द. व्हर्जिन इन इंडिया - ५
यांना माहितीसाठी अग्रेषित. गुरुवार पेठ पुणे-४२